# पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग
## कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी

जा.क्र.कृमविदा/पशुदुग्ध/586 /२०२३ दिनांक:- ०४/१२/२०२३

### जाहीर नोटीस

कृषि महाविदयालय, दापोलीच्या पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग कृषि महाविद्यालय आस्थापना, मुख्य योजना (Establishment of Agriculture college Main Scheme) येथे दुग्धशाळा प्रक्षेत्रावर विविध कामे ठेका पद्धतीने करावयाची आहेत. तरी ठेकेदारांने कामाचे स्वरूप प्रत्यक्ष दुग्धशाळा प्रक्षेत्रावर येऊन पहाणी करावी. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ. क्र | कामाचा कालावधी | कामांचा तपशिल | आवश्यक युनिट |
|---|---|---|---|
| १. | ०१/०१/२०२४ ते ३१/०३/२०२४ | १. दुभत्या गायी व म्हैशींचे सकाळ-संध्याकाळ दूध काढणे<br>२. दुधाचे सकाळ-संध्याकाळ पॅकिंग करणे<br>३. भांडारगृहातून खादय वाहतूक करणे<br>४. म्हशींना खाद्य खायला घालणे.<br>५. गायी व म्हशी धुणे, खरारा करणे व तत्संबंधी कामे करणे<br>६. दुग्धशाळा प्रक्षेत्र,शिवाजीनगर प्रक्षेत्र व विद्यापीठ प्रक्षेत्र येथे हिरवी वैरण कापणे<br>७. कापलेल्या वैरणीची गठ्ठे बांधणे<br>८. वैरण ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरणे<br>९. वैरण गोठयांवर किंवा चाफ कटर शेडवर उतरवून ठेवणे<br>१०. गाय-म्हैशी, वासरे, रेडके गोठयांतील शेण कंपोस्ट खड्यांवर वाहतूक करून गोठे धुणे<br>११. गाय-म्हैशी,वासरे, रेडके यांचे गोठे धुवून फिनेल टाकून साफ करणे व दूध काढते वेळी जनावरांचे शेण ओढणे<br>१२.गाय-म्हैशी,वासरे,रेडके यांच्या गोठयांच्या शेजारील पेडॉकची साफ-सफाई करणे<br>१३.गाय-म्हैशी,वासरे, रेडके यांच्या गोठयांतील जाळया व काचा साफ करणे व छताची स्वच्छता ठेवणे<br>१४. गाय-म्हैशी,वासरे, रेडके गोठयांच्या परिसराची साफ-सफाई करून स्वच्छता ठेवणे.<br>१५. डचबार्न मधील सुकी वैरण, चॅपिंग केलेली हिरवी वैरण गोठयांवर व दोन्ही पेडॉकमध्ये वाहतूक करणे व जनावरांना घालणे<br>१६. गाय-म्हैशी,वासरे, रेडके यांना योग्य वेळेत खादय घालणे<br>१७. वाकवली प्रक्षेत्रावरून भातपेंढा व गवत वाहतूक करणे.<br>१८. पोल्ट्री कक्षाकडे काम करणे.<br>१९. शिवाजी नगर व दुग्धशाळा प्रक्षेत्रावरील वैरण पिकांना रासायनिक खते देणे.<br>२०. विद्यापीठातील विविध प्रक्षेत्रावरून गांडूळ खत निर्मितीयोग्य गवत, काडी कचरा ट्रॉलीत जमवून आणणे.<br>२१. गांडूळ खत तयार करणे व तत्संबंधी इतर कामे करणे<br>२२. आंबा बागेतील बांडगुळे काढणे, झाडी झुडपे तोडून साफ सफाई करणे.<br>२३. काजू बागेतील झाडी झुडपे तोडून साफ सफाई करणे व कुंपण दुरूस्ती करणे.<br>२४. आंबा व काजू बागेत राखण करणे.<br>२५. काजू बागेतील तयार काजू बी गोळा करणे, वाळविणे व भांडागत जमा करणे.<br>२६. दुग्धशाळा प्रक्षेत्र व शिवाजी नगर प्रक्षेत्रावरील नविन वैरण लागवडीसाठी पुर्वतयारी करणे व लागवड करणे.<br>२७. प्रक्षेत्रावर पहारेकऱ्यांच्या सार्वजनिक व साप्ताहीक सुट्टीच्या काळात रात्री कामावर हजर राहणे व त्यांना नेमुन दिलेली कामे करणे<br>२८. शिवाजी नगर व दुग्धशाळा प्रक्षेत्रावरील लागवड केलेल्या वैरण प्लॉटमधील | १२७४ |

Scanned with ACE Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | गॅप भरणे.<br>२९. शिवाजी नगर व दुग्धशाळा प्रक्षेत्रावरील लागवड केलेल्या वैरण प्लॉटनां पाणी देणे.<br>३०. लागवड केलेल्या वैरण प्लॉटमध्ये विडर मारणे.<br>३१. मा. प्रमुख/ मा. दुग्धशाळा व्यवस्थापक, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग यांनी वेळोवेळी कामाबाबतच्या केलेल्या सूचनेनूसार अनुषंगिक अत्यावश्यक काम करणे. | |
| | | **एकूण युनिट** | **१२७४** |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि दरपत्रक नमुना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये कामासाठी आवश्यक **१२७४** युनिटच्या होणाऱ्या एकुण रकमेचा स्पष्ट उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक. **२२/१२/२०२३** पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहित दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"दुग्धशाळा प्रक्षेत्रावरील कामाचा ठेका"** असा उल्लेख करावा, बंद लिफाफा **मा. प्रमुख, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविदयालय दापोली** यांचे नावे पाठवावा. पोष्टाद्वारे होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

प्रमुख
पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग
कृषि महाविदयालय दापोली

**प्रत:** दुग्धशाळा प्रक्षेत्र नोटिस बोर्ड, ग्रामपंचायत गिम्हवणे, ग्रामपंचायत जालगांव, नगरपंचायत दापोली, कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ.बा.सा.को.कृ.विद्यापिठ, दापोली, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे प्रसिध्दीसाठी लावण्यात येत आहे.

Scanned with ACE Scanner

## ठेक्याबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती

१) प्रक्षेत्रावरील कामे संबंधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२) ठेकेदाराने विभागाच्या गरजेनुसार पुरूष व स्त्री कंत्राटी कामगारांचा पुरवठा करावा.

३) प्रक्षेत्रावर कंत्राटी कामगारांनी विहित वेळेत काम करणे आवश्यक आहे.

४ ) निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

५) सुट्टीच्या दिवशी प्रक्षेत्रावर काम असल्यास ठेकेदारास कंत्राटी कामगार पुरविणे बंधनकारक राहील.

६) प्रक्षेत्रावरील दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

७) ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८) प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

९) ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुष्यंगीक रक्कम संबंधीत कामगारांच्या बँक खाती जमा करणे आवश्यक आहे.

१०) प्रक्षेत्रावर लागणारे कंत्राटी कामगार पुरवून त्यांची हजेरी ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल. फक्त मजूर युनिटची नोंद कार्यालय ठेवील.

११) ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

१२) कंत्राटी कामगार पुरविण्याचा दर हा सर्व करासहीत असावा.

१३) विद्यापीठ परिपत्रक जा.क्र.बासाकोकृवि/आस्था/ब-५/३३६६/२०२३ दि. २५ ऑगस्ट २०२३ अन्वये कंत्राटी कामगारांचा अपघाती विमा काढणे ठेकेदारास बंधनकारक राहिल.

१४) ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

१५) याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१(ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१६) ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

१७) ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१८) प्रक्षेत्रासंबंधी ठेक्यात नमुद केलेली सर्व कामे ठेकेदाराच्या कंत्राटी कामगारास करणे बंधनकारक राहतील.

१९) प्रक्षेत्रावरील पिकांचे व मालमत्तेचे नुकसान किंवा चोरी आपण पुरविलेल्या कंत्राटी कामगारांकडून झाल्यास नुकसान भरपाईसाठी ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

२०) प्रक्षेत्रावर काम करत असताना कंत्राटी कामगारास दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारांची राहिल.

२१) प्रक्षेत्रावरील दिलेली कामे करतांना एखादा कंत्राटी कामगार हलगर्जीपणा करीत असल्याचे निदर्शनास आल्यास विभाग प्रमुख, यांच्या सुचनेनुसार त्यास बदलण्याची जबाबदारी ठेकेदारांकडे राहिल.

२२) अटी व शर्तीचे ठेकेदाराने पालन न केल्यास ठेका त्वरीत बंद करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांना राहतील.

२३) प्रक्षेत्रावर काम करीत असताना एखादा कंत्राटी कामगार कामासंबंधी विभागातील कर्मचाऱ्याशी वाद किंवा भांडण करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या कंत्राटी कामगारास कामावरून बंद करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

२४) ठेकेदारामार्फत दिल्या जाणाऱ्या वरील सेवा /सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकारपणे पालन करणे बंधनकारक राहिल

२५) उपरोक्त कामासाठी ठेकेदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे नियम अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगीक लाभ अनुज्ञेय / लागू राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे विद्यापीठ प्रशासन व शासन जबाबदार राहणार नाही.

२६) ठेक्यासंबंधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विदयापीठ प्रशासनाला राहतील.

प्रमुख
पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभाग
कृषि महाविदयालय दापोली

Scanned with ACE Scanner